# जगद्वंद्य अवधूत दिगंबर, दत्तात्रय गुरु तुम्हीच ना

जगद्वंद्य अवधूत दिगंबर, दत्तात्रय गुरु तुम्हीच ना ।
अनन्य भावे शरणागत मी, भवभय वारण तुम्हीच ना ।
कार्तवीर्य यदु परशुरामही, प्रबोधिले गुरु तुम्हीच ना ।
स्वामी जनार्दन एकनाथ तरि, कृतार्थ केले तुम्हीच ना ।
नवनारायण सनाथ करुनी, पंथ निर्मिला तुम्हीच ना ।
मच्छिंद्रादि यति प्रवृत्त केले, जन उध्दारा तुम्हीच ना ।
दासोपंता घरी रंगले, परमानंदे तुम्हीच ना ।
नाथ सदनीचे चोपदार तरी, श्रीगुरु दत्ता तुम्हीच ना ।
युगायुगी निजभक्त रक्षणा, अवतरतां गुरु तुम्हीच ना ।
बालोन्मत्त पिशाच्च वृत्ती, धारण करतां तुम्हीच ना ।।१।।
स्नान काशिपुरी चंदन पंढरी, संध्या सागरी तुम्हीच ना ।
करुनी भिक्षा करविरी भोजन, पांचाळेश्वरि तुम्हीच ना ।
तुळजापुरि करशुद्धी ताम्बुल, निद्रा माहुरी तुम्हीच ना ।
करुनि समाधि मग्न निरंतर, गिरनारी गुरु तुम्हीच ना ।
विप्र स्त्रियेच्या वचनी गुंतले, पीठापुरी गुरु तुम्हीच ना ।
श्रीपादवल्लभ नृसिंहसरस्वती, करंजनगरी तुम्हीच ना ।
जन्मताच ॐकार जपोनी, मौन धरियेले तुम्हीच ना ।
मौंजीबंधनी वेद वदोनि, जननि सुखविली तुम्हीच ना ।।२।।
चतुर्थाश्रम जीर्णोध्दारा, आश्रम घेउनि तुम्हीच ना ।
कृष्णसरस्वती सदगुरु वंदुनी, तीर्था गमले तुम्हीच ना ।
माधवारण्य कृतार्थ केला, आश्रम देउनि तुम्हीच ना ।
पोटशुळाची व्यथा हरोनि, विप्र सुखाविला तुम्हीच ना ।
वेल उपटुनी विप्रा दिधला, हेमकुंभ गुरु तुम्हीच ना ।
तस्कर वधुनी विप्र रक्षिला, भक्तवत्सला तुम्हीच ना ।
विप्रस्त्रियेचा पुत्र उठविला, निष्ठा देखुनि तुम्हीच ना ।
हीन जिव्हा वेदपाठी केला, सजिव करुनी तुम्हीच ना ।।३।।
वाडी नरसिंह औदुंबरिही, वास्तव्य करुनी तुम्हीच ना ।
भीमाअमरजा संगमी आले, गाणगापूरी गुरू तुम्हीच ना ।
ब्रह्ममुहूर्ति संगमीस्थानी, अनुष्ठानी रत तुम्हीच ना ।
भिक्षा ग्रामी करुनी राहता, माध्याह्नी मठी तुम्हीच ना ।
ब्रम्हाराक्षसा मोक्ष देउनी, उद्धरिले मठी तुम्हीच ना ।
वांझमहिषी दुभविले, फुलविले शुष्ककाष्ठ गुरु तुम्हीच ना ।
नंदीनमा कुष्ठी केला, दिव्य देहि गुरु तुम्हीच ना ।
त्रिविक्रमा विश्वरूप दाऊनि, कुमसि ग्रामी तुम्हीच ना ।।४।।
अगणित दिधले धान्य कापुनी, शुद्रा शेत गुरु तुम्हीच ना ।
रत्नाईचे कुष्ठ दवडिले, तीर्थे वर्णित तुम्हीच ना ।
आठही ग्रामी भिक्षा केली, दीपवाळी दिनी तुम्हीच ना ।
भास्कर हस्ते चार सहस्त्रा, भोजन दिधले तुम्हीच ना ।
निमिषमात्रे तंतुक नेला, श्रीशैल्यासी तुम्हीच ना ।
सायंदेवा काशियात्रा, दाखविली गुरु तुम्हीच ना ।
चांडाळा मुखी वेद वदविले, गर्व हराया तुम्हीच ना ।
साठ वर्षी वांझेसी दिधले, कन्या पुत्रही तुम्हीच ना ।।५।।
कृतार्थ केला मानस पूजनी, नर केसरी गुरु तुम्हीच ना ।
माहुरचा सतिपति उठवोनी, धर्म कथियला तुम्हीच ना ।
रजकाचा यवनराज बनवुनी, उद्धरिला गुरु तुम्हीच ना ।
अनन्यभावे भजता सेवक, तरतिल वदले तुम्हीच ना ।
कर्दळीवनीचा बहाणा करुनी, गाणगापुरीस्थित तुम्हीच ना ।
निर्गुण पादुका दृष्य ठेऊनी, गुप्त स्वामी मठी तुम्हीच ना ।
विठाबाईचा दास मूढ परि, अंगिकारिला तुम्हीच ना
आत्मचिंतनी रमवा निशिदिनी, दीनानाथ गुरु तुम्हीच ना।।६।।